अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

जा.क्र.अम / सका - १८ / २००८.
महानगरपालिका सचिव कार्यालय.
दिनांक : ११ -१२ -२००८.

अहमदनगर महानगरपालिकेच्या खास सभेची सुचना.

( मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण २ - नियम क्र. १ (ह) अन्वये.)
सभा सुचना क्रमांक १८ , दिनांक १५-१२-२००८.

प्रति,
सन्मा.श्री. / श्रीमती..............................................................

सदस्य / सदस्या, प्रभाग क्रमांक
अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

महोदय / महोदया,

यांस-

याद्वारे कळविण्यांत येते की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण २ - नियम क्र. १ (ह) अन्वये मा.महापौर यांनी अहमदनगर महानगरपालिकेची खास सभा सोमवार दिनांक १५-१२-२००८ रोजी दुपारी १-०० वाजता महानगरपालिका सभागृहात सोबतच्या विषय पत्रिकेतील कामकाज चालविण्यांसाठी आयोजित केली आहे.

आपणांस सभेस उपस्थित राहण्यांची विनंती करण्यांत येत आहे.

नगर सचिव
अहमदनगर महानगरपालिका.

सोबत : १. दि.२८-०७-२००८ दि.२०-०८-२००८,
दि.१५-०९-२००८ चे इतिवृत्त
२. विषयपत्रिका.
३. प्रस्तावाची टिप्पणी.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

सभा क्रमांक १८  दिनांक १५-१२-२००८ रोजी  दु. १.०० वां होणा-या मा.खास सभेची विषय पत्रिका.

-- *--

| विषय क्रमांक | विषय |
|---|---|
| १ | दिनांक २८-०७-२००८ दि.२०-०८-२००८, दि.१५-०९-२००८ , रोजी  झालेल्या अनुक्रमे मा.सर्वसाधारण सभेचे व खास सभेचे इतिवृत्त कायम करणे बाबत. |
| २ | दुखवटयाचे प्रस्ताव. |
| ३ | मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९ अ अन्वये अहमदनगर महानगरपालिकेमध्ये प्रभाग समित्यांची स्थापना करणे बाबत ऑफिस रिपोर्ट मंजुरीस्तव सादर. |
| ४ | मुख्यलेखापरिक्षकांची कार्यपध्दती व अधिकारी विनियम २००८ बाबतचा ऑफिस रिपोर्ट आदेशार्थ सादर. |
| ५ | मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतुदीनुसार अहमदनगर महानगरपालिकेचे आरोग्य केंद्रासाठी पी.एच.एन.( पब्लिक हेल्थ नर्स ) ची दोन पदे निर्माण करणे करीता मा.शासनाकडे प्रस्ताव पाठविणेंस मंजुरी मिळणें बाबत ऑफिस रिपोर्ट आदेशार्थ सादर. |
| ६ | अहमदनगर महानगरपालिकेच्या नियोंजित छत्रपती संभाजी महाराज पुर्णाकृती पुतळा बसविणेच्या कामकाजा करीता आढावा समिती गठीत करणे बाबत ऑफिस रिपोर्ट आदेशार्थ सादर. |
| ७ | मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज. |

मा.महापौर यांचे मान्यतेने.
दिनांक :  ११-१२-२००८.

नगर सचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : १ दिनांक : १५-१२-२००८.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

प्रस्तावाचा विषय : मागील दिनांक २८/०७/२००८, दिनांक २०/०८/२००८, दिनांक १५/०९/२००८ रोजी झालेल्या अनुक्रमे मा.सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

-- ** --

प्रस्तावाचा मजकुर : मागील दिनांक २८/०७/२००८, दिनांक २०/०८/२००८, दिनांक १५/०९/२००८ रोजी झालेल्या मा.सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणेसाठी मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेविले.

-- * --

**चर्चा :** मा.श्री.दिप चव्हाण :- महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक आत्ताच पार पडली. तिची आचारसंहिता संपली का ? संपली असेल तर केंव्हा संपली ?

उपायुक्त श्री.हांगे :- महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक ३०/११/२००८ रोजी झाल्यानंतर दिनांक १/१२/२००८ रोजी मतमोजणी झाली. मतमोजणी नंतर शासकीय गॅझेट मध्ये सदस्य नांवे प्रसिध्दी साठी ५ तारखेपर्यंत मुदत दिली होती. परंतु ३ तारखेला महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात नवनिर्वाचित सदस्यांची नांवे पत्ते प्रसिध्द करण्यांत आली. शासन राजपत्रात नांवे प्रसिध्द झाल्या नंतर आचार संहिता संपुष्टात आली.

मा.श्री.दिप चव्हाण :- दिनांक ०५/१२/२००८ पर्यंत राजपत्रात नांवे प्रसिध्द करणे आवश्यक होते. परंतु दि. ०५/१२/२००८ नंतर सध्या सभा घ्यावी असे काही शासनाचे परिपत्रक / पत्र आहे काय ? आजची मिटींग कशी काढली. उक्त कालावधीत मिटींग घेता येते काय ? दिनांक २८/०७/२००८, २०/०८/२००८ व दि.१५/०८/२००८ च्या सर्व साधारण / खास सभेचे इतिवृत्त नोंदवही सिल करण्यात आली होती. मग मागचे इतिवृत्ताचे काय ? सिल कधी काढण्यांत आले ? नगरसचिव यांनी उत्तर द्यावे.

श्री.एस.ए,हब्बु , नगरसचिव :- महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक सन २००८ ची आदर्श आचार संहिता सुरु झाल्यानंतर आचार संहितेचा भंग होवु नये म्हणुन मा.आयुक्त सो, यांनी सदर इतिवृत्त नोंदवही सिल करुन ठेवली होती. सन्माननिय महापौरांची दिनांक ३०/१२/२००८ अखेर मुदत आहे. ३० तारखेला त्यांचा कार्यकाळ समाप्त होत आहे. त्यांचे आदेशानुसारच आजची खास सभा घेण्यांत आलेली आहे. महानगरपालिका निवडणुक २००८ ची आदर्श आचार संहिता दिनांक ०३/१२/२००८ रोजी संपल्यानंतर सदर इतिवृत्ताचे सिल काढण्यात आले.

उपायुक्त श्री.हांगे :- मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे तरतुदीनुसार आजची महानगरपालिकेची खास सभा बोलाविण्यांत आलेली आहे.

मा.श्री.दिप चव्हाण :- दिनांक २८/०७/२००८, २०/०८/२००८ व दिनांक १५/०९/२००८ च्या सभांचे इतिवृत्त कायम केल्यानंतरची जबाबदारी महानगरपालिका प्रशासनाने घ्यावी.

मा.श्री.अनंत जोशी :- महानगरपालिकेच्या नविन प्रशासकीय इमारतीत आज पहिली सभा होत असतांना खुद्द आयुक्त साहेब आज मिटींगला उपस्थित नाहीत.

मा.श्री.संदिप कोतकर महापौर :- आयुक्त साहेब महानगरपालिका कामकाजा निमित्तच नाशिक येथे गेलेले आहेत.

मा.श्री.अभय आगरकर :- या विषयामध्ये नगरसचिवाला टार्गेट करु नका. त्यांची पात्रता पहा. त्यांना या पदावर काम करण्याची इच्छा नाही. ते वारंवार सांगतात नगरसचिव पदाचे काम मला नको दुस-या कोणालाही द्या. त्यांची तयारी नाही. योग्य पात्रतेची व्यक्ती त्या जागी नेमा अशी माझी या सभागृहास विनंती आहे.

उपायुक्त श्री.हांगे :- आगरकर साो, यांनी मांडलेला मुद्दा योग्य आहे. आपण योग्य पात्रतेच्या माणसाची नगरसचिव पदी नियुक्ती करण्यास जाहीरात दिली आहे. इतर नगरपालिका महानगरपालिका यांना पण पत्र दिलेली आहे. महानगरपालिका सभा प्रशासन कामकाजाचा १० वर्षाचा अनुभव व विधी शाखेची पदवी धारण करणारा असावा अशीपण अट नमूद केलेली आहे.

मा.श्री.आगरकर :- शासनास विनंती करुन त्यांचेकडुन कक्ष अधिकारी व तत्सम पदाचा अधिकारी मागवावा.

मा.श्री.सुनिल त्रिपाठी :- महानगरपालिकेच्या नविन प्रशासकीय इमारतीत आजची ही सभा बोलाविण्यात आली त्याबद्दल मी महापौर उपमहापौर यांचे प्रथम अभिनंदन करतो. आजचे हे जे मागील सभेचे इतिवृत्त कायम करण्यासाठी आलेले आहे. ते सभा झाल्यानंतर ५ महिन्यांनी आलेले आहे. ते ५-५ महिन्यांनी का येते ?

उपायुक्त श्री.हांगे :- महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक २००८ ची आचार संहिता लागू होती. त्यामध्ये बराच काळ गेला. त्या कालावधीत बैठक घेण्यात आली नाही. त्यामुळे मागील इतिवृत्त कायम करण्यास उशिर झालेला आहे.

मा.श्री.सुनिल त्रिपाठी :- स.नं.११७ व ११८ ची वरील आरक्षणाची माहिती पूर्णपणे चुकीची आहे. सदर जागा रयत शिक्षण संस्थेची आहे. मागील सभेत या जागेच्या आरक्षणा बाबत चर्चा झाली. चर्चा झाली एक आणि प्रोसिडींग मध्ये वेगळया पध्दतीने लिहीली गेलेली आहे. स्वातंत्र्य सैनिकांच्या जागेवरील आरक्षणा बाबत पण चूकीचा निर्णय घेण्यात आलेला आहे. हे इतिवृत्त मंजूर / कायम करण्यात येवु नये. संपुर्ण प्रोसिडींग चूकीचे झालेले आहे.

श्री.धोंगडे, नगररचनाकार :- सदर आरक्षणाच्या विषया बाबत आपली चर्चा झालेली होती. चर्चेप्रमाणे निर्णय घेण्यात आलेला आहे. आरक्षणांबाबत या सदस्यांनी याद्या पण दिल्या होत्या.

मा.श्री.त्रिपाठी :- सदस्यांच्या याद्यांचा प्रश्न नाही. चर्चा झाली एक आणि प्रोसिडींग लिहीले एक सदरचे प्रोसिडींग मंजूरीसाठी शासनाकडे पाठवू नका अन्यथा आम्हाला इतर पर्यायी मार्गांचा अवलंब करावा लागेल.

मा.श्री.भगवान फुलसौंदर :- शहरातील आरक्षणा बाबत झालेल्या चर्चे प्रमाणे इतिवृत्त लिहीले गेले नाही. आरक्षण कायम ठेवावे अशा ठिकाणी आरक्षण उठवावे असे केलेले आहे. सदर आरक्षणाचा विषयात पैसे खावुन काम झालेले आहे. यात मोठा अपहार झालेला आहे. सदरचा विषय पेडींग ठेवा नाहीतर सदर विषयावर मतदान घ्या. सदर विषयास भाजपा शिवसेना पक्षाच्या नगरसेवकांचा विरोध आहे.

मा.श्री.कृ.द.जाधव :- मागील सभेत हा विषय घेतला होता. आपण सर्वांनी त्यावर चर्चा केलेली आहे. सर्वांनी एकमताने विषयपण मंजूर केलेला आहे. सदर बाबत शासनाकडे शिफारशी पाठवा. चर्चेतुन समज गैरसमज करु नका.

मा.श्री.कैलास गिरवले :- मागील इतिवृत्त कायम करण्या करीता विषय ठेवलेला आहे. सभागृहात याबाबत चर्चाही झालेली आहे. इतिवृत्त कायम करताना तो विषय रद्द करता येत नाही. इतिवृत्तात काही सुचना / दुरुस्त्या करावयाच्या असतील तर त्या सुचना करा. मागील सभेत या विषया बाबत कोणीही विरोध केला नाही. आरक्षणाच्या यादीत शेतकरी व गरीब कुटुंबातील व्यक्तींचेही आरक्षण उठवले आहे. त्यांची संख्या जवळ जवळ ८० ते ९० % आहे. माझी सभागृहास विनंती आहे की, मागील इतिवृत्त कायम करण्याचा विषय मंजूर करावा.

**ठराव :** मागील सभेचे इतिवृत्त कायम करणेंस मंजूरी देण्यात येत आहे. विकास योजना अहमदनगर (वा.क्षे.) महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमाच्या कलम ३० अन्वये मा.शासनास मंजुरीसाठी सादर करावी

सुचक : मा.श्री. कृ.द.जाधव
अनुमोदक : मा.श्री. किशोर डागवाले .
ठराव बहुमताने मंजुर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : २ दिनांक : १५-१२-२००८.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

प्रस्तावाचा विषय : दुखवटयाचे प्रस्ताव.

-- ** --

प्रस्तावाचा मजकुर : .

ठराव : दोन मिनिटे स्तब्ध उभे राहुन श्रध्दांजली वाहण्यांत आली.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ३ दिनांक : १५-१२-२००८.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**प्रस्तावाचा विषय :** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९ अ अन्वये अहमदनगर महानगरपालिकेमध्ये प्रभाग समित्यांची स्थापना करणे बाबत ऑफिस रिपोर्ट मंजुरीस्तव सादर.

--*--

**प्रस्तावाचा मजकुर :** विनंती रिपोर्ट की, भारतीय राज्य घटनेच्या ७४ वी सुधारणा परिच्छेद २४३ एस् व ध तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम २९-अ अन्वये प्रभाग समित्या स्थापन करणे व त्यांची रचना करणे ही जबाबदारी महानगरपालिकेची आहे. उपरोक्त कलमातील पोटकलम १ नुसार सोबतच्या तक्त्याप्रमाणे चार प्रभाग समित्या स्थापन करणे आवश्यक आहे. अहमदनगर शहराची लोकसंख्या २००१ च्या जनगणनेनुसार ३,०६,३८१ इतकी आहे. शहराचे क्षेत्रफळ ८४.०० चौ.की.मी. असुन प्रभागाची संख्या ६५ असुन भौगोलिक सलग्नतेचा विचार करुन सोबतच्या तक्त्याप्रमाणे प्रभाग समित्या प्रस्तावित आहे. प्रभाग समित्या स्थापन केल्यानंतर त्या विभागातील प्रश्न त्याच प्रभागात कार्यक्षमतेने सोडविणे व सत्तेचे विकेंद्रीकरण करणे हा मुळ उद्देश भारतीय संविधानाचा आहे.

**१.** प्रत्येक प्रभाग समितीमध्ये त्या त्या भौगोलिक क्षेत्रातील निवडणूक प्रभागांचे प्रतिनिधीत्व करणारे पालिका सदस्य असतील.

**२.** प्रभाग समितीचा प्रादेशिक क्षेत्राचा अधिकारी म्हणुन प्रभाग अधिकारी राहील.

**३.** प्रभाग समितीच्या क्षेत्रामध्ये काम करणा-या मान्यताप्राप्त स्वयंसेवी संघटनांचे तीन नामधारी सदस्य नामनिर्देशित सदस्य असतील तसेच दि.१ जुलै २००० च्या शासन निर्णयाप्रमाणे -

अ.नं. ३) बिनसरकारी संघटना व समाजलक्षी संघटना यांना अधिनियमातील तरतुदीनुसार मान्यता देण्याचे निकष. --

संबंधित अधिनियमातील तरतुदी अंतर्गत प्रभाग समित्यांमध्ये सदस्य नामनिर्देशित करण्याच्या प्रयोजनासाठी संघटनांच्या मान्यतेसाठी निकष पुढील प्रमाणे असतील. --

अ) उक्त संघटना मुंबई सार्वजनिक न्यास अधिनियम १९५० (१९५० चा मुंबई एकोणतीस) किंवा सोसायटीज नोंदणी अधिनियम १८६० (१८६० चा एकवीस) याखाली नोंदणीकृत असाव्यात.

ब) उक्त संघटनांनी सदस्याचे नामनिर्देशनाच्या दिनांका आधीच्या तीन वर्षाचे लेखा परीक्षा झालेले लेखा विवरणपत्र आणि कामाचा अहवाल धर्मादाय आयुक्तांकडे सादर केलेला असावा.

क) उक्त संघटनांनी भारतीय संविधानातील अनुसूची १२ मध्ये नगरपालिकांची जी कामे दर्शविली आहेत त्यांचेशी संबंधित कमीत कमी एक प्रकल्प सदस्याचे नामनिर्देशनाच्या आधीच्या तीन वर्षात पूर्ण केलेला असावा.

अ.नं.४) प्रभाग समितीचा सदस्य नामनिर्देशित करण्यासाठी अर्हता. --

उक्त संघटनांचा असा कोणताही सदस्य की जो कोणत्याही राजकीय पक्षाचा पदाधिकारी नाही किंवा केंद्र शासन. राज्य शासन, कोणतीही महानगरपालिका किंवा नगरपरिषदा यांच्या सेवेत नाही अशी व्यक्ती प्रभाग समिती सदस्य म्हणून नामनिर्देशित होण्यासाठी पात्र असेल.

अ.नं.५) बिनसरकारी संघटना आणि समाजलक्षी संघटना यांच्या सदस्यांची निवड करणे आणि नामनिर्देशन करणे याची पध्दत. --

उक्त संघटना प्रभाग समित्यांमध्ये प्रतिनिधीत्व मिळण्यासाठी संबंधित प्रभाग अधिका-याकडे अर्ज सादर करतील. प्रभाग अधिकारी प्रभाग समित्यांमधील निर्वाचित नगरसेवकांपुढे हे अर्ज ठेवतील आणि निर्वाचित सदस्य अर्जदारांमधून प्रभाग समित्यांचे सदस्य नामनिर्देशित करतील. जर प्रभाग समित्यांवर कोणत्या सदस्याचे नामनिर्देशन करावयाचे याबाबत एकमत होऊ शकले नाही तर निर्वाचित नगरसेवक त्यांची निवड बहुमताने करतील. अशा प्रकारे नामनिर्देशित केलेल्या प्रभाग समितीच्या सदस्यांचे सदस्यत्व त्याने राजीनामा दिल्यास किंवा तो ज्या संघटनेचे प्रतिनिधीत्व करीत असेल त्या संघटनेच्या सदस्य पदावरुन काढून टाकला गेल्यास समाप्त होईल.

**४**. प्रभाग समितीची मुदत महानगरपालिकेच्या मुदतीबरोबरच समाप्त होईल.

**५**. प्रभाग समितीच्या निवडुन आलेल्या पालिका सदस्यांमधुन पहिल्या सभेत सभापतीची निवडणूक होईल.

**६**. सभापतीची मुदत १ वर्ष राहील.

**७**. प्रभाग समितीची कामे व कर्तव्ये खालील प्रमाणे असतील. :--

अ) प्रभागातील पाणीपुरवठा, जलनि:स्सारण स्वच्छता, पावसाच्या तुंबलेल्या पाण्याची विल्हेवाट.

ब) स्थानिक आवश्यक सेवांच्या बाबतीत नागरिकांची गा-हाणी दूर करणे.

क) प्रभागातील विकास कामांचे नियोजन व रचना करणे.

ड) प्रभागातील संबंधित खर्चाच्या अंदाजाचे अर्थसंकल्प दरवर्षी डिसेंबर अखेर पर्यंत निरनिराळ्या लेखाशिर्षासह आयुक्तांकडे प्रभाग समितीने शिफारस करणे बंधनकारक आहे.

इ) प्रभाग समितीच्या क्षेत्रात पार पाडावयाच्या रु.५.०० लक्ष पर्यंतच्या कामांना, नकाशांना, प्रशासकीय, वित्तीय मान्यता देणे, मात्र त्या कामांचा समावेश

प्रभागाच्या व महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात असणे आवश्यक आहे.

फ) अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणे यावर नियंत्रण ठेवणे.

**८**. प्रभाग समितीची सभा प्रत्येक महिन्यातून एक वेळेस प्रभाग कार्यालयात होईल. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण तीन कलम ४३ नुसार तसेच अनुसूची " ड " प्रकरण-२ तसेच महानगरपालिकाने सभेचे कामकाज नियम मान्य केले असल्यास त्याप्रमाणे समितीचे कामकाज चालेल व त्याची इतिवृत्तात नोंद होईल. प्रभाग समितीने सर्व निर्णय विचार-विनिमय करुन ठरावान्वये महानगरपालिकेस पाठविणे बंधनकारक राहील.

प्रभाग अधिकारी हा प्रभाग समितीच्या प्रशासकीय व वित्तीय बाबीवर नियंत्रण ठेवील तो प्रभागातील प्रशासकीय व वित्तीय बाबीस जबाबदार राहील तसेच प्रभागातील समस्ये बाबतही जबाबदार राहील. याशिवाय त्याची खालील प्रमाणे कर्तव्ये राहतील :--

१. प्रभागातील दैनंदिन कामकाजावर नियंत्रण व देखरेख ठेवणे.

२. मिळकतकर यासह पाणीपट्टी जाहीरातकर, मार्केट वसुली संकलीत करणे व नविन इमारती शोधुन कर आकारणी करणे, महानगरपालिकेची भाडे वसुली करणे

३. प्रभागातील दैनंदिन स्वच्छता व कचरा उचलणे यावर देखरेख ठेवणे.

४. अनधिकृत बांधकामे, अतिक्रमणे यावर नियंत्रण ठेवणे.

५. प्रभागातील सार्वजनिक रस्ते, नाले, गटारे यांची दुरुस्ती देखभाल करणे, नविन कामे प्रस्तावित करणे.

६. प्रभागातील सार्वजनिक शौचालये, मुता-या स्वच्छ ठेवणे, साफसफाई करुन घेणे.

७. प्रभागातील उद्याने विकसीत करणे त्याची निगा ठेवणे.

८. प्रभागातील दिवाबत्ती देखभाल, दुरुस्ती करणे व नविन दिवाबत्ती व्यवस्था करणे.

९. प्रभागात स्मशानभूमी येत असल्यास त्याची निगा ठेवणे, दुरुस्ती करणे.

१०. प्रभागातील पाणीपुरवठ्याची व्यवस्था करणे, सर्व प्रभागातील व्यवस्थीत व शुध्द पाणी पुरवठा होईल याची दक्षता घेणे.

११. मोकाट कुत्री व मोकाट जनावरे यांची व्यवस्था करणे.

१२. महानगरपालिका किंवा आयुक्त वेळोवेळी सोपविल असे व इतर जबाबदारी पार पाडणे.

**९.** प्रभाग समिती स्तरावर खालील प्रमाणे अधिकारी कर्मचारी असतील. :-

I) प्रभाग अधिकारी (संविधानिक पद) प्रभाग समितीच्या दैनंदिन कामकाज तो त्या प्रभागातील समस्ये साठी जबाबदार राहील यावर दैनंदिन प्रशासकीय व वित्तीय देखरेख ठेवणे.

II) प्रभाग अभियंता :-- सार्वजनिक बांधकाम विभाग -- उद्यान, रस्ते, गटार दुरुस्ती, नविन बांधकामाचे नकाशे, अंदाजपत्रके तयार करणे, प्रभागातील दैनंदिन कामावर देखरेख करणे.

III) प्रमुख लिपीक :-- प्रभाग अधिका-याच्या नियंत्रणाखाली दैनंदिन कामकाज पाहील.

IV) वरिष्ठ लिपीक (सामान्य) :-- मुख्य लिपीकाच्या नियंत्रणाखाली दैनंदिन काम पाहिल.

V) वरिष्ठ लिपीक (लेखा) (B.Com) :- दैनंदिन लेख्याच्या नोंदी ठेवणे, भरणा करणे इ. वित्त विषयक कामे.

Vi) प्रभाग स्वच्छता निरीक्षक :- प्रभाग स्वच्छतेची कामे, मोकाट जनावरे नियंत्रण, गटारी / कामे साफसफाई इ.सफाई विषयक कामे.

Vii) कनिष्ठ लिपीक :- ८

सा.प्र.वि. -- ४ लिपीक, इतर -- ४ लिपीक,

शिपाई. -- आवश्यकते नुसार. मजूर. -- आवश्यकते नुसार.

वरील प्रमाणे प्रभाग समिती स्थापित करण्यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९-अ अन्वये व भारतीय राज्य घटनेचा ७४ व्या सुधारणातील २४३ नुसार अनिवार्य असल्याने सदरचा विषय येत्या महासभेसमोर घेवुन निर्णय होणेस विनंती आहे.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, प्रस्तावित मा.महासभेकडे निर्णयासाठी पाठविणे करीता मंजुरीस्तव सादर.

यावर मा.महापौर साहेब यांचा अभिप्राय की, " महासभा "

अशाबाबतचा ऑफिस रिपोर्ट उपायुक्त (सा) व मा.महापौर साहेब यांचे अभिप्रायासह पुढील निर्णयास्तव मा.खास सभेपुढे ठेविला.

--*--

**चर्चा :**

मा.श्री.अभय आगरकर :- भौगोलिक क्षेत्रानुसार प्रभाग समितीची कामाची कक्षा ठरविण्यात आलेली आहे. त्याची भौगोलिक रचना स्पष्ट करा ?

ज्यु.इंजिनिअर श्री.बल्लाळ :- सार्वत्रिक निवडणुक २००८ मधील शहरातील प्रभागांची एकुण संख्या ६५ आहे. त्यानुसार प्रत्येक प्रभाग समितीत साधारणतः १४ ते १८ वॉर्ड घेण्यात आलेले आहेत.

मा.श्री.अभय आगरकर :- १४ ते १५ वॉर्डांचा एक प्रभाग केला पण त्या प्रभाग समितीतील सदस्यांची संख्या किती असेल.

मा.श्री.संदिप कोतकर महापौर :- त्या-त्या प्रभाग समिती कक्षेतील वॉर्डातून निवडुन आलेले पालिका सदस्य व त्या प्रभाग समितीच्या कार्यक्षेत्रात काम करणा-या मान्यता प्राप्त स्वयंसेवी संघटनेचे तीन नामधारी सदस्य नामनिर्देशित सदस्य असतील.

मा.श्री.अभय आगरकर :- हा प्रभाग समिती स्थापनेचा ठराव शासनाकडे मंजूरीसाठी जाणार व शासन त्याप्रमाणे मंजूरी देणार पण मुंबई महानगरपालिका, पुणे महानगरपालिका यांच्या पेक्षा आपल्या प्रभाग समित्या वेगळया आहेत असे का ?

उपायुक्त श्री.हांगे :- प्रभाग समित्या स्थापन करणेचा प्रस्ताव आल्यानंतर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम २९-अ नुसार प्रभाग समित्यांची संख्या ठरविण्यांत आलेली आहे. अहमदनगर महानगरपालिकेचे क्षेत्र विचारात घेता कोण-कोणत्या ठिकाणी प्रभाग समित्या ठेवावयाच्या त्या किती ठेवावयाच्या हे महानगरपालिका सभेने ठरवावयाचे आहे.

मा.श्री.अभय आगरकर :- प्रभाग समितीमध्ये स्वयंसेवी संघटनांना प्रतिनिधीत्व कसे देणार. स्वयंसेवी संघटनांचा ऑडीट रिपोर्ट हा चांगला असला पाहिजे. त्यांचे काम चांगले असावे. पारितोषिक पात्र स्वयंसेवी संस्थांना प्राधान्य द्यावे. चांगले काम करणा-या संस्था, ज्येष्ठ नागरीक संघटना असतील चांगले काम करणारे इंजिनिअर्स, आर्किटेक्ट असतील काही नामांकीत डॉक्टर्स वकील असतील त्यांचे काम पाहुन त्यांना प्राधान्यक्रम देवुन निवड करावी. स्नेहालय सारखी काम करणारी एखादी संस्था असेल अशा संघटना हव्या. त्यांना नियम निकष हवेत. अशी तरतुद करावी. शासनाकडे आमच्या शिफारशी कळवाव्यात.

उपायुक्त श्री.हांगे :- स्वयंसेवी संस्था होण्याचा निवडीचा अधिकार महानगरपालिकेकडे ठेवावा. अशी आपण तरतुद करु शकता.

मा.श्री.अभय आगरकर :- स्वयंसेवी संस्था फक्त नोंदणीकृत असाव्यात फक्त एवढेच पूरे नाही.

मा.श्री.दिपक सुळ उपमहापौर :- प्रभाग समित्या स्थापनेबाबतचा प्रस्ताव इतिवृत्त व आपण सर्वांनी केलेल्या सूचना या शासनाकडे मंजूरीसाठी पाठविल्या जातील. त्यात शासन त्यांच्या नियमाप्रमाणे दुरुस्त्या करुन पाठविल.

उपायुक्त श्री.हांगे :- प्रभाग समित्या स्ाापन केल्यानंतर प्रत्येक प्रभाग समितीस तिच्या कार्यक्षेत्रातील कामकाजासाठी किती निधी मंजूर करावयाचा हा महानगरपालिका सभेचा अधिकार आहे. प्रभाग समितीचा निधी कमी जास्त प्रमाणात करु शकता. मात्र त्यासाठी अर्थ संकल्पातच तरतुद करावी लागेल.

मा.श्री.दिपक सुळ उपमहापौर :- प्रभाग समित्या स्थापन करतांना एक नविन नियम किंवा अट टाका की तो सदस्य माजी नगरसेवक असावा.

उपायुक्त श्री.हांगे :- मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९-अ व भारतीय राज्य घटनेच्या ७४ वी घटना दुरुस्ती परिच्छेद २४३ एस. नुसार व शासनाच्या मार्गदर्शनानुसार प्रभाग समित्यांची रचना करण्यात आलेल्या आहेत. त्या व्यतिरिक्त आपल्या काही सूचना असतील त्या आपण शासनास कळवू.

मा.श्री.कैलास गिरवले :- प्रभाग समितीत संघटनेचे प्रतिनिधी स्वतंत्र पण तीनही एकाच संघटनेचे की वेगवेगळया संघटनेचे एखारी व्यक्ती समाजसेवा करणारा एकटा असेल तर त्याचे काय ? त्याने महानगरपालिका कामकाजा संबंधी एखादा वैशिष्ट्यपुर्ण प्रकल्प केलेला असावा. महानगरपालिके बरोबर इतरही ठिकाणी त्याने कामे केलेली अट असावी.

उपायुक्त श्री.हांगे :- इतर ठिकाणी म्हणजे ग्रामीण भागात काम करणारी किंवा काम केलेली संस्था नको. कारण ग्रामीण समस्या व शहरी समस्या या वेगवेगळया असतात. त्यांना शहरी समस्यांवर काम करणे शक्य होणार नाही.

मा.श्री.कैलास गिरवले :- प्रभाग समितीचा सदस्य हा माजी नगरसेवक असल्यास चालणार नाही काय ?

उपायुक्त श्री.हांगे :- शासनाच्या मार्गदर्शनानुसार प्रभाग समितीचा आराखडा तयार करण्यांत आलेला आहे. आपल्या काही हरकती अगर सूचना असल्यास त्या द्या. आपण त्या शासनाकडे पाठवू.

मा.श्री.अनंत जोशी :- प्रभाग समितीचा सदस्य हा त्या भागातीलच रहिवासी असावा.

मा.श्री.कृ.द.जाधव :- प्रभाग समितीचा सदस्य हा नगरसेवक असावा पण तो पराभूत झालेला नसावा.

मा.श्री.संदिप कोतकर महापौर :- आपल्या सर्व सूचना / मुद्दे घेवून ते शासनाकडे पाठविले जातील तसेच नकाशा मध्ये दर्शविलेले प्रभाग समिती क्रमांक १ मधील प्रभाग क्रमांक १८ हा प्रभाग प्रभाग समिती क्रमांक २ मध्ये दर्शविण्यात यावा. तसेच प्रभाग समिती क्रमांक २ मधील तक्त्यामध्ये दर्शविलेला प्रभाग क्रमांक १९ प्रभाग समिती क्रमांक १ मध्ये दर्शविणेत यावा.

---*---

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट व नकाशा या बाबत ठरविण्यांत येते की, नकाशा मध्ये दर्शविलेले प्रभाग समिती क्रमांक १ मधील प्रभाग क्रमांक १८ हा प्रभाग प्रभाग समिती क्रमांक २ मध्ये दर्शविण्यात यावा. तसेच प्रभाग समिती क्रमांक २ मधील तक्त्यामध्ये दर्शविलेला प्रभाग क्रमांक १९ प्रभाग समिती क्रमांक १ मध्ये दर्शविणेत यावा. या दुरुस्तीसह तसेच नकाशामध्ये फेरबदल करणेस देखील मान्यता देण्यांत येत आहे. तसेच सन्माननीय सदस्य यांनी केलेल्या पुढील सुचना देखील प्रभाग समिती तयार करतांना प्राधान्याने विचारात घेण्यांत याव्यात.

१) स्वयंसेवी संस्था मधील सदस्य यांचा समावेश प्रभाग समिती सहाय्यक पदावर निवड करताना, सदर संस्थेची निवड प्रशासनाने दक्षता पूर्वक करावी.

२) अशा संस्थेचा सदस्य निवडणे पूर्वी संबंधित संस्थेचा तीन वर्षाचा जमा-खर्च यांचा ताळेबंदाची प्रत व लेखापरिक्षण अहवाल प्रत प्रशासनाने तपासावी.

३) समाजामध्ये अग्रगण्य असलेल्या संस्थेमध्ये पदावर कार्यरत सदस्य तसेच विविध क्षेत्रात नैपूण्य मिळविलेली व्यक्ती यांस प्राधान्य असावे.

४) प्रभाग समिती मधील प्रभागाकरीता नागरी सुविधा देण्याकरीता निधीची आवश्यकता असणार आहे अशा निधीची प्रभाग निहाय निश्चीत स्वरुपाची रक्कम महासभेने ठरवावी. तसेच ठरलेल्या रकमेचे अर्थ संकल्पामध्ये तरतुद करावी.

५) माजी नगरसेवक असलेल्या व्यक्तीस प्रभाग समितीचा सदस्य निवडणेस देखिल प्राधान्य असावे मात्र अशी व्यक्ती महानगरपालिकेच्या निवडणुकीत भाग घेवुन पराभुत झालेली नसावी.

६) प्रभाग समिती मा.सदस्य हा संबंधित प्रभागामध्ये रहिवाशी असावा किंवा परिसरातील रहिवाशी असावा मतदार यादीमध्ये सदरचे व्यक्तीचे नांव असणे आवश्यक.

७) कायद्याचे ज्ञान असणा-या अनुभवी तसेच पदवीधर व्यक्तीस प्राधान्य देण्यांत यावे.

८) प्रभाग समितीचा सदस्य होण्याकरीता महानगरपालिकेचे कराची त्याचे स्वतःचे नावावर थकबाकी असु नये.

९) इतर महानगरपालिकेमध्ये प्रभाग समिती सदस्य निवडतांना कोणते निकष वापरले प्रभाग निहाय लोकसंख्या तसेच त्यांनी केलेली आर्थिक तरतुद याबाबत माहिती संकलीत करावी.

१०) स्वयंसेवी संस्थेचा सदस्य निवडतांना सदर संस्था महानगरपालिका हद्दीमध्ये कार्यरत असावी.

११) प्रभाग समिती कार्यालय व तदुनषंगिक कामे उदा.अधिकारी,कर्मचारी वगैरे गोष्टी प्राधान्यक्रमाने पुर्ण करुन कामकाजास सुरुवात करण्यांत येवुन कामकाजाचा अनुभव व आढावा अहवाल महासभेपुढे सादर करावा व त्यानंतर पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक : मा.श्री.कृ.द.जाधव,
अनुमोदक : मा.श्री.अभय आगरकर,
ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९-अ प्रभाग समित्यांची स्थापना तसेच भारतीय संविधानाच्या ७४ व्या घटना दुरुस्तीतील परिच्छेद २४३ नुसार.**

---*---

**वॉर्डांची संख्या :- ६५**

**लोकसंख्या :- ३,०६,३८१**

**शहराचे क्षेत्रफळ :- ८४ चौ.कि.मी.**

**भौगोलिक संलग्नता असलेले प्रभाग.**

| प्रभाग समिती क्रमांक व कार्यालयाचे स्थळ व समाविष्ट प्रभाग संख्या | समाविष्ट प्रभाग | प्रभाग समितीमध्ये समाविष्ट भाग |
|---|---|---|
| प्रभाग समिती क्र.१ सावेडी उपनगर क्षेत्र समाविष्ट प्रभाग संख्या - १७ | १,२,३,४,५,७,८, ९,१०,११,१२,१३, १४,१५,१६,१७,१८ | बोल्हेगांव, नागापूर, नगर-मनमाड रोड, आठरे पाटील शाळा, भिस्तबाग, तपोवन रोड, ढवणवस्ती, पाईपलाईन रोड, गुलमोहोर रोड, भिस्तबाग रोड, लक्ष्मीनगर, सुर्यानगर, संचारनगर, यशोदानगर, श्रीरामचौक, वसंत टेकडी, कविजंग नगर, तवलेनगर, मार्कंडेय सोसायटी, आनंदनगर, टी.व्ही.सेंटर, पाईपलाईन हडको, सिव्हील हडको, ( ), सावेडी गावठाण, प्रोफेसर कॉलनी चौक, झोपडी कॅन्टीन परिसर, धर्माधिकारी मळा, रासनेनगर, वैदुवाडी, कोहीनूर मंगल कार्यालय, जुना पिंपळगांव रोड. |
| प्रभाग समिती क्र.२ जूने महानगरपालिका कार्यालय नगर गांवठाण समाविष्ट प्रभाग संख्या - १८ | ३४,३५,३६,३७, ३८,३९,४०,४१, ४२,४३,४६,४७, ४९,५०,२६,२७, २८,१९ | बागडपट्टी, सर्जेपूरा, जुने सिव्हील हॉस्पीटल, चितळेरोड, तोफखाना, दिल्लीगेट परिसर, सातभाई मळा, नालेगांव, अमरधाम, सबजेल चौक, आनंदीबाजार, गौरीघुमट, लक्ष्मीकारंजा, नविपेठ, महात्मा गांधी रोड, माळीवाडा, फिरोदिया हायस्कुल, विशाल गणेश मंदीर, वसंत टॉकीज परिसर, आशा टॉकीज चौक, कोतवाली पोलिस स्टेशन, महावीर चौक, पटवर्धन चौक, कोर्ट परिसर, झारेकर गल्ली, गाडगीळ पटांगण, महावीर नगर, भुतकरवाडी, बालिकाश्रम रोड, बागरोजा हडको, दातरंगे महा, बालिकाश्रम झोपडपट्टी मार्केट यार्ड, माळीवाडा हरीजन वस्ती, कोठी, कानडेमळा व मद्रासी चाळ, संभाजी महाराज व्यापारी संकुल, नालेगांव, नगर-कल्याण रोड, आदर्शनगर, भावनाऋषी सिनानदीचा पश्चिमेकडील भाग. |

| | | |
|---|---|---|
| प्रभाग समिती क्र.३<br>रंगभवन समाविष्ठ<br>प्रभाग संख्या - १४ | ६,२०,२१,२२,२९,<br>२३,२४,२५,३०,<br>३१,३२,४४,४५,<br>३३. | जुने मुकुंदनगर, नविन मुकुंदनगर, वाबळे कॉलनी, फकीरवाडा,दर्गादायरा, डीएसपी ऑफिस, तारकपूर, सेंट झेव्हीयर हायस्कुल, कराचीवाला नगर, रामवाडी, मंगलगेट, बेलदारगल्ली, झेंडीगेट, तालुका पोलिस स्टेशन, हमालवाडा, अशोका हॉटेल, टेलिफोन व पोस्ट ऑफिस, बुथ हॉस्पीटल, जिल्हाधिकारी व उपजिल्हाधिकारी कार्यालय व निवासस्थाने, अहमदनगर कॉलेज, यशवंत कॉलनी, सिध्दार्थ नगर, रंगभवन कोठला झोपडपट्टी बारस्कर कॉलनी, लालटाकी, सिव्हील हॉस्पीटल, तारकपूर बस स्टॉप, विराज कॉलनी, आरटीओ मधील शासकीय कर्मचारी निवासस्थाने, जुना दाणेडबरा, पारशाखुंट, रामचंद्र खुंट, आडतेबाजार, पिंजारगल्ली, हातकपूरा, ऐतिहासिक वस्तु संग्रहालय, सी.एस.आर.डी., बाबा बंगाली. |
| प्रभाग समिती क्र.४<br>बुरुडगांव उपकार्यालय<br>समाविष्ठ प्रभाग<br>संख्या - १६ | ४८,५१,५२,५३,<br>५४,५५,५६,५७,<br>५८,५९,६०,६१,<br>६२,६३,६४,६५. | वाडियापार्क, नवा व जुना टिळक रोड, बुरुडगांव भाजी मार्केट,रमन कार्यालय,कोठी रोड पूर्व भाग, भाजी मार्केट, सारसनगर, केदारेवस्ती, शांतीनगर, विनायक नगर, आय.टी.आय., शासकीय तंत्रनिकेतन, आनंदनधाम, आनंदऋषी हॉस्पीटल, भोसले आखाडा,चंदन इस्टेट, बुरुडगांव रोड, बुरुडगांव गावठाण,आझादनगर, जुना नविन कचरा डेपो, व्ही.आर.डी.ई.पट्टीवर, नगर-दौंड रोड, दौंड रेल्वे लाईन, केडगांव औद्योगिक वसाहत, केडगांव देवी मंदीर, केडगांव गावठाण, केडगांव हरीजन वस्ती, रेल्वे स्टेशन, आगरकर मळाख कायनेटीक चौक, मल्हार चौक, लोखंडी पुल, भिमदरी, जयभीम सोसायटी, पंचशील कॉलनी, अचानक वस्ती, सक्कर चौक, विळे रोड, कारमेल शाळा, अयोध्यानगर, भुषणनगर, वैष्णवनगर, शाहूनगर, कांबळेमळा, पाच गोडावून, नगर-पुणे रोड, सोनेवाडी रस्ता. |

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ४ दिनांक : १५-१२-२००८.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**प्रस्तावाचा विषय :** मुख्यलेखापरिक्षकांची कार्यपध्दती व अधिकारी विनियम २००८ बाबतचा ऑफिस रिपोर्ट आदेशार्थ सादर.

--*--

**प्रस्तावाचा मजकुर :** उपरोक्त विषयास अनुसरून लेखा परिक्षण विभागाकडील उपविधी सोबत जोडले आहेत. सदरचे उपविधी मान्यतेसाठी महानगरपालिका महासभेपुढे ठेवणे बाबत आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, प्रस्तावित नुसार उपविधी (लेखापरिक्षण वि.) मंजुरीसाठी महानगरपालिका सभेकडे पाठविणे योग्य राहील.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, महासभेची मंजुरी घ्यावी.

यावर मा.महापौर साहेब यांचा अभिप्राय की, नगरसचिव महासभेत विषय घ्यावा.

अशाबाबतचा ऑफिस रिपोर्ट मा.उपायुक्त (सा) , मा.आयुक्त साहेब , मा.महापौर साहेब यांचे अभिप्रायासह पुढील निर्णयास्तव मा.खास सभेपुढे ठेविला.

--*--

चर्चा :- **मा.श्री.दिप चव्हाण :-** ऑफिस रिपोर्टानुसार विषय मंजूर.

--*--

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट मंजुर नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री.दिप चव्हाण,<br>
अनुमोदक : मा.श्री.कृ.द.जाधव,<br>
ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-<br>
महापौर,<br>
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर

# मुख्यलेखापरीक्षकांची कार्यपध्दती व अधिकार

# विनियम - २००८

**अहमदनगर महानगरपालिका अहमदनगर**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ४६५ पोटकलम (२) खंड (क) च्या तरतुदीनुसार महानगरपालिकेच्या निधीतुन केलेल्या खर्चाला मान्यता न देण्यासंबंधी वा लेखापरीक्षणात निघालेल्या आक्षेपांचे निराकरण करण्यासंबंधी महापालिका मुख्य लेखा परिक्षकांची कार्यपध्दती व अधिकारांचे नियमन करण्यासंबंधी केलेले विनियम.

# विनियम

## १. संक्षिप्त शीर्षक व अंमलात येण्याचा दिनांक

(एक) हे विनियम " अहमदनगर महानगरपालिका ( मुख्य लेखा परीक्षकांची कार्यपध्दती व अधिकार)
विनियम २००८ " या नावाने संबोधले जातील.

(दोन) राज्य शासनाच्या मान्यतेनंतर शासकीय राजपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ते अंमलात
येतील.

## २. व्याख्या

संदर्भात किंवा अर्थात काहीही प्रतिकूल नसल्यास या विनियमात --------

(अ) " अधिनियम " म्हणजे वेळोवेळी सुधारित मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ (१९४९ चा ५९)

( ब) " कलम " म्हणजे अधिनियमाचे कलम.

(क) " लेखापरीक्षक "या शब्दात महानगरपालिका मुख्य लेखा परिक्षकाने लेखा परीक्षणाचे कामासाठी
नियुक्त केलेल्या त्याच्या कार्यालयातील कर्मचारी व अधिकारी वर्गाचा समावेश असेल.

(ड) " मुख्य लेखा परीक्षक " म्हणजे अधिनियमाच्या कलम ४५ च्या तरतुदीनुसार नेमण्यात आलेला
अधिकारी.

## ३. लेखा परिक्षणाच्या कामाचे स्वरुप

मुख्य लेखा परिक्षक लेखा तपासणीचे काम करतांना खालील बाबी लक्षात घेईल.

(अ) अधिनियमाच्या कलम १०५ (१) च्या तरतुदीप्रमाणे महानगरपालिकेच्या लेख्यांची साप्ताहिक
तपासणी व लेखापरिक्षण करणे.

(ब) महापालिकेला येणे असलेल्या करांसहीत सर्व रकमांची वसुली महापालिकेच्या निधीतून खर्च झालेल्या रकमांचे लेखा परिक्षण , (अधिनियमाच्या अनुसूची 'ड' च्या ३ च्या नियम ५ नुसार) (क) महापालिका आयुक्ताने त्याचे कार्यकारी अधिकारात दिलेल्या आदेशावरुन विशिष्ट

आर्थिक मर्यादेपलीकडील वा विशिष्ट प्रकारच्या देयकांचे पूर्व लेखापरिक्षण करणे व वर उल्लेख आलेले लेखापरिक्षण हे विनियम व अधिनियमाच्या अनुसुचि 'ड' च्या प्रकरण ३ मधील नियम ९ च्या अधिकारात मुख्य लेखा परिक्षकाने केलेल्या नियमांच्या अधीन असेल.

## ४. लेखापरीक्षणाची सूचना वगैरे

अ) महापालिकेच्या एखादया विभागातील लेखा परीक्षण सुरु करण्यापूर्वी मुख्य लेखापरिक्षण त्या
विभागप्रमुखाला किमान तीन दिवस अगोदर लेखी सूचना देईल.

ब) लेखा परीक्षणासाठी कोणत्या नस्ती , कागदपत्रे, विवरणपत्र आवश्यक असतील त्याची सर्वसाधारण
कल्पना त्याच पत्राव्दारे दिली जाईल.

क) विभाग प्रमुख वरील 'ब ' प्रमाणे आवश्यक कागदपत्रे उपलब्ध ठेवील व मुख्य लेखा परिक्षकाने
मागणी केल्यास ती त्याचे कार्यालयातही पाठवील.

## ५. लेखापरीक्षणासाठी द्यावयाच्या सुविधा

लेखापरीक्षणाचे काम कोणताही अडथळा न येता , शांतपणे करणे शक्य व्हावे यासाठी लेखापरीक्षणासाठी आलेल्या अधिकारी व कर्मचारी वर्गाची कार्यालयातील एका बाजूच्या स्वच्छ व सोयीस्कर भागात बसण्याची व्यवस्था व आवश्यक स्टेशनरी उपलब्ध केली जावी.

## ६. लेखा परीक्षण पथकाची कार्यपध्दती

लेखापरिक्षण पथकाचा प्रमुख वरिष्ठ अधिकारी / कर्मचारी लेखा तपासणी सुरु करण्यापूर्वी कार्यालय प्रमुख अथवा त्याचे गैरहजेरीत कार्यालयातील सर्वात वरिष्ठ अधिकारी / कर्मचा-याची भेट घेवून नियोजित कामाची माहिती देईल.तसेच आवश्यक नस्ती, आदेश, देयके, ठराव वगैरे करुन देण्यासंबंधी व लेखापरिक्षण करतांना येणा-या अडचणीसंबंधी आवश्यक ती स्पष्टीकरणे त्वरीत पुरविण्यासंबंधी विनंती करील.

## ७. लेखा परीक्षणातील मुद्यांची माहिती घेणे

अ) लेखा परिक्षण करतांना कोणत्याही मुद्यासंबंधी विशेष स्पष्टीकरण आवश्यक वाटल्यास लेखापरिक्षण
अर्ध सामासिक ज्ञापनाच्या स्वरुपात त्या संबंधी माहिती मागील मुख्य लेखापरीक्षण या ज्ञापनावर सही
करील.

ब) अर्धसामासिक ज्ञापन प्राप्त झाल्यावर कार्यालय प्रमुख त्यावरच त्याचे स्पष्टीकरण देऊन सही करुन मूळ
ज्ञापन करत करील. मूळ ज्ञापनाची व त्यावरील उत्तराची छायाप्रत अभिलेखासाठी स्वत:कडे ठेवील .हे

स्पष्टीकरण शक्य तेवढया त्वरेने अथवा दिलेल्या मुदतीत दिले गेले पाहिजे.

क) ज्या आक्षेपांचे स्पष्टीकरण मुख्य लेखा परीक्षकाने मान्य केले नसेल व ज्या आक्षेपांचे स्पष्टीकरण मुदतीत दिले जाणार नाही त्या सर्वांच्या प्रारुक लेखापरिक्षण अहवालात समावेश करण्यात येईल.

ड) प्रारुप लेखापरिक्षण अहवालातील आक्षेपांसंबंधी मुख्य लेखा परिक्षक, विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुखाशी चर्चा करील.त्यावेळी अहवालातील आक्षेपांचे लेखी स्पष्टीकरण घेऊन ते समाधानकारक वाटल्यास लेखा परीक्षक तशी प्रारुप अहवालावर नोंद ठेवील.

इ) अर्धसामासि ज्ञापने ,त्यांची देण्यात आलेली उत्तरे, प्रारुप अहवालांचे चर्चेचे वेळी प्राप्त झालेली स्पष्टीकरण , प्रारुप अहवाल ही सर्व कागदपत्रे मुख्य लेखा परिक्षक वा त्यांनी याबाबत अधिकार प्रदान केलेल्या त्यांचे विभागातील अधिका-याला सादर केली जातील.

## ८. लेखा परीक्षण अहवालावरील पुढील कार्यवाही

(१) विनियम ७ (इ) प्रमाणे आलेल्या कागदपत्रांच्या अनुषंगाने लेखा परिक्षण अहवाल अंतिम करण्याची जबाबदारी विनियम ७ (इ) मध्ये उल्लेख केलेल्या अधिका-याची असेल.

(२) वरील खंड (१) नुसार अंतिम करण्यात आलेला अहवाल संबंधीत विभाग व कार्यालय प्रमुखांकडे पाठविण्यात येईल.

## ९. लेखा परीक्षण अहवालावरील संबंधित कार्यालयांनी करावयाची कार्यवाही

(१) लेखा परीक्षण अहवालात आक्षेप घेतलेल्या मुद्यांचे निराकरण करण्याची जबाबदारी विभाग प्रमुखाची असेल.

(२) कार्यालय प्रमुख लेखा परीक्षण आक्षेपांची उत्तरे तयार करुन ती विभाग प्रमुखामार्फत मुख्य लेखा परीक्षकाकडे पाठवील.

(३) कार्यालय प्रमुखाकडून लेखा परीक्षण आक्षेपांची उत्तरे , अधिनियम, नियम, उपविधी, विनियम, स्थायी आदेश, महापालिकेचे ठराव या सर्व निकषांवर तपासून ती योग्य वाटल्यासच विभागप्रमुख ती मुख्य लेखा परिक्षकांकडे सादर करील.

मात्र, योग्य त्या सक्षम प्राधिका-याची मान्यता घेतलेली नाही असे विभाग प्रमुखाच्या निदर्शनास आल्यास तसे करण्याविषयी तो कार्यालय प्रमुखास सुचवू शकेल.त्यानंतर कार्यालय प्रमुखाला त्या आदेशाचे पालन करावे लागेल.

## १०. मुख्य लेखापरिक्षकाची कार्यपध्दती

विनियम ९ च्या तरतुदीनुसार विभागप्रमुखाकडून आक्षेप निराकरणा संबंधीचे स्पष्टीकरण प्राप्त झाल्यावर मुख्य लेखा परिक्षक -

अ) ते स्पष्टीकरण मान्य करुन लेखा आक्षेपाचे निराकरण झाल्याची नोंद घेईल किंवा

ब) दिलेल्या स्पष्टीकरण योग्य न वाटल्यास त्याबाबतची कारणे नमूद करुन तो आक्षेप व विभाग प्रमुखाने दिलेले उत्तर आयुक्ताचे निदर्शनास आणून त्या आक्षेपाबाबत आयुक्ताकडून माहिती मागविल.आयुक्ताकडून आलेली माहिती / स्पष्टीकरण मान्य झाल्यास लेखा आक्षेपाचे निराकरण झाले अशी नोंद तो घेईल किंवा.

क) आयुक्ताने दिलेले स्पष्टीकरण अपुरे वाटल्यास मुख्य लेखा परिक्षक पुन्हा एकवार अधिक माहिती मागवू शकेल वा त्यानंतरही लेखा आक्षेप वगळणे शक्य नाही असे वाटल्यास ती बाब स्थायी समितीला द्यावयाच्या पंधरवाडा अहवालात तो नमूद करील.

ड) वरील (अ) व (ब) बाबतही वेगळे आठवडी अहवाल स्थायी समितीसमोर ठेवण्यात येतील.

इ) ही विवरणपत्रे द्यावयाचे नमुने स्थायी समितीने विहित केल्याप्रमाणे असतील.

## ११. <u>लेखा परीक्षण अहवालावरील स्थायी समितीची कार्यवाही.</u>

विनियम (१) च्या तरतुदीप्रमाणे स्थायी समितीपुढे ठेवण्यात आलेल्या अहवालांवर

(अ) स्थायी समिती मागवील ती जादा माहिती देण्याची मुख्य लेखा परीक्षकाची जबाबदारी असेल.

(ब) मुख्य लेखापरीक्षकाने पंधरवाडा अहवालात एखादी बाब महानगरपालिकेपुढे ठेवण्याची शिफारस केली असल्यास स्थायी समितीच्या अभिप्रायासह ती तशी ठेव-याची जबाबदारी मुख्य लेखापरीक्षकाची असेल.

## १२. <u>लेखा परीक्षण विभागातील खर्चाचे लेखापरिक्षण</u>

(अ) मुख्य लेखा परीक्षकाने खर्चासाठी दिलेल्या मंजुरीच्या प्रकरणांची लेखापरीक्षा, उपायुक्त, आयुक्त करील.

(ब) या विनियमात लेखापरीक्षेसंबंधी केलेल्या सर्व तरतुदी योग्य त्या बदलांसह( Mutais Mutandis) त्या लेखापरीक्षणाला लागू असतील.

--*--

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ५ दिनांक : १५-१२-२००८.

----------- -----------------------------------

**प्रस्तावाचा विषय :** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतुदीनुसार अहमदनगर महानगरपालिकेचे आरोग्य केंद्रासाठी पी.एच.एन.( पब्लिक हेल्थ नर्स ) ची दोन पदे निर्माण करणे करीता मा.शासनाकडे प्रस्ताव पाठविणेंस मंजुरी मिळणें बाबत ऑफिस रिपोर्ट आदेशार्थ सादर.

-- * --

**प्रस्तावाचा मजकूर :** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतुदीनुसार अहमदनगर महानगरपालिकेचे आरोग्य केंद्रासाठी पी.एच.एन.(पब्लिक हेल्थ नर्स ) ची दोन पदे निर्माण करणे बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मंजुरीसाठी ठेवणेत आलेला होता.

मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ७ दिनांक १६-९-२००८ अन्वये खालील प्रमाणे ठराव पारित केलेला आहे.

" मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतुदीनुसार अहमदनगर महानगरपालिकेचे आरोग्य केंद्रासाठी पी.एच.एन.(पब्लिक हेल्थ नर्स ) ची दोन पदे निर्माण करणे करीता मा.शासनाकडे प्रस्ताव पाठविणेस मंजुरी देण्यांत येत आहे. अखेर मंजुरीसाठी मा.महानगरपालिका सभेपुढे सादर "

तरी उपरोक्त ठरावाप्रमाणे सदरचा प्रस्ताव मा.महानगरपालिका सभेपुढे ठेवणेस मंजुरी बाबत आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, " अ " प्रस्तावित नुसार महासभेसमोर मान्यतेसाठी ठेवणे करीता मंजुरीस्तव सादर.

यावर मा.महापौर साहेब यांचा अभिप्राय की, नगरसचिव महासभेसमोर सादर करा.

अशाबाबतचा ऑफिस रिपोर्ट मा.उपायुक्त (सा) व मा.महापौर साहेब यांचे अभिप्रायासह पुढील निर्णयास्तव मा.खास सभेपुढे ठेविला.

**चर्चा :-** दिप चव्हाण :- ऑफिस रिपोर्टानुसार विषय मंजूर.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट मंजूर. नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री.नामदेव पवार,
अनुमोदक : मा.श्री.भगवान फुलसौंदर,
ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ६ दिनांक : १५-१२-२००८.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**प्रस्तावाचा विषय :** अहमदनगर महानगरपालिकेच्या नियोंजित छत्रपती संभाजी महाराज पुर्णाकृती पुतळा बसविणेच्या कामकाजा करीता आढावा समिती गठीत करणे बाबत ऑफिस रिपोर्ट आदेशार्थ सादर.

-- * --

**प्रस्तावाचा मजकूर :** अहमदनगर महानगरपालिकेने मा.महासभा ठराव क्र.२ दि.२१-७-०७ अन्वये सावेडी भागातील प्रोफेसर कॉलनी चौकच्या बाजुस संभाजी महाराजांचा पुर्णाकृती पुतळा उभारणेसाठी मान्यता दिलेली आहे.

हा प्रस्ताव मा.कला संचालनालयाच्या मंजुरीसाठी सादर करण्यांत आला होता. सदर पुतळयाच्या क्ले मॉडेलला मा.कला संचालनालय,महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र. डिओअे - २००८ / दोन / १२६३ दि. २९-५-२००८ ने मंजुरी दिलेली आहे.

प्रस्तावाच्या नियोजित चबुत-याचे आराखडे मा.मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, महाराष्ट्र राज्य यांचेकडे सादर केले होते व त्यास त्यांचे पत्र क्र. मुवाशा / पुतळा / १०२१ दि.५-८-०८ अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे.

वर नमुद दोन्ही मंजुरी प्राप्त झालेनंतर सदरचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी , अहमदनगर यांचेकडे मंजुरीसाठी पाठविला असुन त्यास मा.जिल्हाधिकारी,अहमदनगर यांची मंजुरी प्राप्त होणे बाकी आहे. या नियोजित पुतळा बसविण्याचे कामाबाबत वर नमुद कार्यवाही पुर्ण झालेली असुन पुढील कार्यवाही प्रगतीपथावर आहे.मा.दशरथ शिंदे, नगरसेवक यांनी संदर्भिय यादी देवुन सदरच्या कामाची स्थिती, त्यात होणारी प्रगती व येणा-या अडचणी बाबत प्रशासन / पदाधिकारी यांची देखरेख रहावी व समन्वय रहावा या दृष्टीने संभाजी महाराजांचा पुर्णाकृती पुतळा उभारणेसाठी " संभाजी महाराज पुतळा कामकाज आढावा समिती " गठित करणे बाबत मा.महापौर यांना विनंती केलेली आहे. सन्माननीय नगरसेवक यांचा हा प्रस्ताव योग्य असुन, संभाजी महाराज यांचा पुतळा उभारणेसाठी अशी समिती स्थापन करणे योग्य ठरेल. मात्र यासाठी सदर प्रस्ताव मा.महासभेपुढे सादर करणे योग्य होईल. सबब सदर प्रस्ताव मा.महासभेपुढे सादर करणे बाबत पुढील आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, पुतळा उभारणी संदर्भातील मा.शासनाचे वेळोवेळीचे निर्णय, परिपत्रके इ.यांच्या नुसार कार्यवाही करणे योग्य. सबब सदरचा प्रस्ताव मा.महासभेसमोर आवश्यक त्या निर्णयार्थ व अवलोकनार्थ नगर रचना विभागामार्फत सादर करणेचे मान्यतेस्तव सादर.

यावर मा.महापौर साहेब यांचा अभिप्राय की, " महासभा "

अशाबाबतचा ऑफिस रिपोर्ट मा.उपायुक्त (कर) व मा.महापौर साहेब यांचे अभिप्रायासह पुढील निर्णयास्तव मा.खास सभेपुढे ठेविला.

**चर्चा :-** मा.श्री.कैलास गिरवले :- छत्रपती संभाजी महाराजांचा पूर्णाकृती पुतळा बसविण्यास महासभेने मंजूरी दिलेली आहे. कलासंचालनालय व मुख्य वास्तुशास्त्रज्ञ यांनी पण मंजूरी दिलेली आहे. आणि आता अखेर मंजूरीस मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडे प्रस्ताव पाठविलेला आहे. संभाजी महाराजांचा पूतळा तयार झालेला आहे. सदर पूतळा बसविणे कामी चार सदस्यांची समिती स्थापन करण्यात यावी म्हणजे पूतळा उभारणीचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्यांत येईल.

मा.श्री.अभय आगरकर :- छत्रपती संभाजी महाराज यांचा पूर्णाकृती पूतळा बसविणे कामकाजासाठी ४ सदस्या ऐवजी ५ सदस्यीय कमिटी नेमली तरी चालेल. पण नेमलेले सदस्य या कामाशी एकनिष्ठ असतील हे पहावे. सदर कमिटीमध्ये आज नेमलेले जे सदस्य असतील तेच शेवटपर्यंत कायम रहातील. आजची बॉडी जरी अस्तीत्वात नाही राहीली तरी आज नियुक्त केलेलेच सदस्य शेवटपर्यंत त्या समितीचे कामकाज पहातील.

-- * --

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट मंजूर. छत्रपती संभाजी महाराज पुतळा देखभाल समिती सदस्यपदी, सदस्य नियुक्तीचे अधिकार मा.महापौर यांना देण्यात येत आहे. या समितीचे अध्यक्ष मा.महापौर असतील. तसेच मा.उपायुक्त (कर) तसेच नगररचनाकार व शहर अभियंता हे प्रशासनिक सदस्य या समितीत समावेशीत करणेस तसेच या कामातील माहिती असलेली व्यक्ती नियमित सदस्य या पदी नियुक्ती करणेस व नियुक्त केलेले सदस्य सदर काम पुर्ण होई पावेतो सदस्य पदी कार्यरत राहतील यास ही सभा मान्यता देत आहे. या समितीची बैठक घेणे व त्यांचे कामकाज शहर अभियंता यांचे कार्यालया मार्फत करणेत यावे.

सुचक : मा.श्री.कैलास गिरवले,
अनुमोदक : मा.श्री.अभय आगरकर,
ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

प्रेषक : अंतर्गत लेखा परिक्षक.
प्रति : नगरसचिव.

प्रस्तावना :

विषय : मुख्यलेखापरिक्षकांची कार्यपध्दती व अधिकारी विनियम २००८ बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

विनंती रिपोर्ट देण्यांत येतो की, उपरोक्त विषयास अनुसरून लेखा परिक्षण विभागाकडील सोबत उपविधी जोडलेले आहेत. सदरचे उपविधी मान्यतेसाठी मा.महासभेपुढे ठेवणेंस मंजुरीस्तव सादर.

अंतर्गत लेखा परिक्षक,
अहमदनगर महानगरपालिका.

प्रेषक : नगरसचिव
प्रति : नगरसचिव
दिनांक : ११-१२-२००८.

**प्रस्तावना :**

**विषय : मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९ अ अन्वये अहमदनगर महानगरपालिकेमध्ये प्रभाग समित्यांची स्थापना करणे बाबत ऑफिस रिपोर्ट मंजुरीस्तव सादर.**

विनंती रिपोर्ट की, भारतीय राज्य घटनेच्या ७४ वी सुधारणा परिच्छेद २४३ एस् व ध तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम २९-अ अन्वये प्रभाग समित्या स्थापन करणे व त्यांची रचना करणे ही जबाबदारी महानगरपालिकेची आहे. उपरोक्त कलमातील पोटकलम १ नुसार सोबतच्या तक्त्याप्रमाणे चार प्रभाग समित्या स्थापन करणे आवश्यक आहे. अहमदनगर शहराची लोकसंख्या २००१ च्या जनगणनेनुसार ३,०६,३८१ इतकी आहे. शहराचे क्षेत्रफळ ८४.०० चौ.की.मी. असुन प्रभागाची संख्या ६५ असुन भौगोलिक सलग्नतेचा विचार करुन सोबतच्या तक्त्याप्रमाणे प्रभाग समित्या प्रस्तावित आहे. प्रभाग समित्या स्थापन केल्यानंतर त्या विभागातील प्रश्न त्याच प्रभागात कार्यक्षमतेने सोडविणे व सत्तेचे विकेंद्रीकरण करणे हा मुळ उद्देश भारतीय संविधानाचा आहे.

**१.** प्रत्येक प्रभाग समितीमध्ये त्या त्या भौगोलिक क्षेत्रातील निवडणूक प्रभागांचे प्रतिनिधीत्व करणारे पालिका सदस्य असतील.

**२.** प्रभाग समितीचा प्रादेशिक क्षेत्राचा अधिकारी म्हणुन प्रभाग अधिकारी राहील.

**३.** प्रभाग समितीच्या क्षेत्रामध्ये काम करणा-या मान्यताप्राप्त स्वयंसेवी संघटनांचे तीन नामधारी सदस्य नामनिर्देशित सदस्य असतील.

वरील प्रमाणे प्रभाग समिती स्थापित करण्यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९-अ अन्वये व भारतीय राज्य घटनेचा ७४ व्या सुधारणातील २४३ नुसार अनिवार्य असल्याने सदरचा विषय येत्या महासभेसमोर घेवुन निर्णय होणेस विनंती आहे.

नगर सचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : १ दिनांक : १५-१२-२००८.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

प्रस्तावाचा विषय : मागील दिनांक २८/०७/२००८, दिनांक २०/०८/२००८, दिनांक १५/०९/२००८ रोजी झालेल्या अनुक्रमे मा.सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

-- ** --

**ठराव :** मागील सभेचे इतिवृत्त कायम करणेंस मंजूरी देण्यात येत आहे.विकास योजना अहमदनगर (वा.क्षे.) महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमाच्या कलम ३० अन्वये मा.शासनास मंजुरीसाठी सादर करावी

सुचक : मा.श्री. कृ.द.जाधव
अनुमोदक : मा.श्री. किशोर डागवाले .
ठराव बहुमताने मंजुर.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ३ दिनांक : १५-१२-२००८.

---

**प्रस्तावाचा विषय :** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९ अ अन्वये अहमदनगर महानगरपालिकेमध्ये प्रभाग समित्यांची स्थापना करणे बाबत ऑफिस रिपोर्ट मंजुरीस्तव सादर.

---*---

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट व नकाशा या बाबत ठरविण्यांत येते की, नकाशा मध्ये दर्शविलेले प्रभाग समिती क्रमांक १ मधील प्रभाग क्रमांक १८ हा प्रभाग प्रभाग समिती क्रमांक २ मध्ये दर्शविण्यात यावा. तसेच प्रभाग समिती क्रमांक २ मधील तक्त्यामध्ये दर्शविलेला प्रभाग क्रमांक १९ प्रभाग समिती क्रमांक १ मध्ये दर्शविणेत यावा. या दुरुस्तीसह तसेच नकाशामध्ये फेरबदल करणेस देखील मान्यता देण्यांत येत आहे. तसेच सन्माननीय सदस्य यांनी केलेल्या पुढील सुचना देखील प्रभाग समिती तयार करतांना प्राधान्याने विचारात घेण्यांत याव्यात.

१) स्वयंसेवी संस्था मधील सदस्य यांचा समावेश प्रभाग समिती सहाय्यक पदावर निवड करताना, सदर संस्थेची निवड प्रशासनाने दक्षता पूर्वक करावी.

२) अशा संस्थेचा सदस्य निवडणे पूर्वी संबंधित संस्थेचा तीन वर्षाचा जमा-खर्च यांचा ताळेबंदाची प्रत व लेखापरिक्षण अहवाल प्रत प्रशासनाने तपासावी.

३) समाजामध्ये अग्रगण्य असलेल्या संस्थेमध्ये पदावर कार्यरत सदस्य तसेच विविध क्षेत्रात नैपूण्य मिळविलेली व्यक्ती यांस प्राधान्य असावे.

४) प्रभाग समिती मधील प्रभागाकरीता नागरी सुविधा देण्याकरीता निधीची आवश्यकता असणार आहे अशा निधीची प्रभाग निहाय निश्चीत स्वरुपाची रक्कम महासभेने ठरवावी. तसेच ठरलेल्या रकमेचे अर्थ संकल्पामध्ये तरतुद करावी.

५) माजी नगरसेवक असलेल्या व्यक्तीस प्रभाग समितीचा सदस्य निवडणेस देखिल प्राधान्य असावे मात्र अशी व्यक्ती महानगरपालिकेच्या निवडणुकीत भाग घेवुन पराभुत झालेली नसावी.

६) प्रभाग समिती मा.सदस्य हा संबंधित प्रभागामध्ये रहिवाशी असावा किंवा परिसरातील रहिवाशी असावा मतदार यादीमध्ये सदरचे व्यक्तीचे नांव असणे आवश्यक.

७) कायद्याचे ज्ञान असणा-या अनुभवी तसेच पदवीधर व्यक्तीस प्राधान्य देण्यांत यावे.

८) प्रभाग समितीचा सदस्य होण्याकरीता महानगरपालिकेचे कराची त्याचे स्वतःचे नावावर थकबाकी असु नये.

९) इतर महानगरपालिकेमध्ये प्रभाग समिती सदस्य निवडतांना कोणते निकष वापरले प्रभाग निहाय लोकसंख्या तसेच त्यांनी केलेली आर्थिक तरतुद याबाबत माहिती संकलीत करावी.

१०) स्वयंसेवी संस्थेचा सदस्य निवडतांना सदर संस्था महानगरपालिका हद्दीमध्ये कार्यरत असावी.

११) प्रभाग समिती कार्यालय व तदुनषंगिक कामे उदा.अधिकारी,कर्मचारी वगैरे गोष्टी प्राधान्यक्रमाने पुर्ण करुन कामकाजास सुरुवात करण्यांत येवुन कामकाजाचा अनुभव व आढावा अहवाल महासभे पुढे सादर करावा व त्यानंतर पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक : मा.श्री.कृ.द.जाधव,
अनुमोदक : मा.श्री.अभय आगरकर,
ठराव सर्वानुमते मंजूर

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ४ दिनांक : १५-१२-२००८.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**प्रस्तावाचा विषय :** मुख्यलेखापरिक्षकांची कार्यपध्दती व अधिकारी विनियम २००८ बाबतचा ऑफिस रिपोर्ट आदेशार्थ सादर.

--*--

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट मंजुर नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री.दिप चव्हाण,
अनुमोदक : मा.श्री.कृ.द.जाधव,
ठराव सर्वानुमते मंजूर.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ५ दिनांक : १५-१२-२००८.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**प्रस्तावाचा विषय :** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतुदीनुसार अहमदनगर महानगरपालिकेचे आरोग्य केंद्रासाठी पी.एच.एन.( पब्लिक हेल्थ नर्स ) ची दोन पदे निर्माण करणे करीता मा.शासनाकडे प्रस्ताव पाठविणेंस मंजुरी मिळणें बाबत ऑफिस रिपोर्ट आदेशार्थ सादर.

-- * --

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट मंजूर. नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री.नामदेव पवार,
अनुमोदक : मा.श्री.भगवान फुलसौंदर,
ठराव सर्वानुमते मंजूर.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ६ दिनांक : १५-१२-२००८.

----------- ------------------------------------

**प्रस्तावाचा विषय :** अहमदनगर महानगरपालिकेच्या नियोजित छत्रपती संभाजी महाराज पुर्णाकृती पुतळा बसविणेच्या कामकाजा करीता आढावा समिती गठीत करणे बाबत ऑफिस रिपोर्ट आदेशार्थ सादर.

-- * --

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट मंजूर. छत्रपती संभाजी महाराज पुतळा देखभाल समिती सदस्यपदी, सदस्य नियुक्तीचे अधिकार मा.महापौर यांना देण्यात येत आहे. या समितीचे अध्यक्ष मा.महापौर असतील. तसेच मा.उपायुक्त (कर) तसेच नगररचनाकार व शहर अभियंता हे प्रशासनिक सदस्य या समितीत समावेशीत करणेस तसेच या कामातील माहिती असलेली व्यक्ती नियमित सदस्य या पदी नियुक्ती करणेस व नियुक्त केलेले सदस्य सदर काम पुर्ण होई पावेतो सदस्य पदी कार्यरत राहतील यास ही सभा मान्यता देत आहे. या समितीची बैठक घेणे व त्यांचे कामकाज शहर अभियंता यांचे कार्यालया मार्फत करणेत यावे.

सुचक : मा.श्री.कैलास गिरवले,
अनुमोदक : मा.श्री.अभय आगरकर,
ठराव सर्वानुमते मंजूर.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

मा.खास सभा दिनांक १५/१२/२००८ रोजीची चर्चा.

मागील सभांचे इतिवृत्त कायम करणे :-

**मा.श्री.दिप चव्हाण :-** महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक आत्ताच पार पडली. तिची आचारसंहिता संपली का ? संपली असेल तर केंव्हा संपली ?

उपायुक्त श्री.हांगे :- महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक ३०/११/२००८ रोजी झाल्यानंतर दिनांक १/१२/२००८ रोजी मतमोजणी झाली. मतमोजणी नंतर शासकीय गॅझेट मध्ये सदस्य नांवे प्रसिध्दी साठी ५ तारखेपर्यंत मुदत दिली होती. परंतु ३ तारखेला महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात नवनिर्वाचित सदस्यांची नांवे पत्ते प्रसिध्द करण्यांत आली. शासन राजपत्रात नांवे प्रसिध्द झाल्यानंतर आचार संहिता संपुष्टात आली.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** दिनांक ०५/१२/२००८ पर्यंत राजपत्रात नांवे प्रसिध्द करणे आवश्यक होते. परंतु दि. ०५/१२/२००८ नंतर सध्या सभा घ्यावी असे काही शासनाचे परिपत्रक / पत्र आहे काय ? आजची मिटींग कशी काढली. उक्त कालावधीत मिटींग घेता येते काय ? दिनांक २८/०७/२००८, २०/०८/२००८ व दि.१५/०८/२००८ च्या सर्व साधारण / खास सभेचे इतिवृत्त नोंदवही सिल करण्यात आली होती. मग मागचे इतिवृत्ताचे काय ? सिल कधी काढण्यांत आले ? नगरसचिव यांनी उत्तर द्यावे.

श्री.एस.ए,हब्बु , नगरसचिव :- महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक सन २००८ ची आदर्श आचार संहिता सुरु झाल्यानंतर आचार संहितेचा भंग होवु नये म्हणुन मा.आयुक्त सा़े, यांनी सदर इतिवृत्त नोंदवही सिल करुन ठेवली होती. सन्माननिय महापौरांची दिनांक ३०/१२/२००८ अखेर मुदत आहे. ३० तारखेला त्यांचा कार्यकाळ समाप्त होत आहे. त्यांचे आदेशानुसारच आजची खास सभा घेण्यांत आलेली आहे. महानगरपालिका निवडणुक २००८ ची आदर्श आचार संहिता दिनांक ०३/१२/२००८ रोजी संपल्यानंतर सदर इतिवृत्ताचे सिल काढण्यात आले.

उपायुक्त श्री.हांगे :- मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे तरतुदीनुसार आजची महानगरपालिकेची खास सभा बोलाविण्यांत आलेली आहे.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** दिनांक २८/०७/२००८, २०/०८/२००८ व दिनांक १५/०९/२००८ च्या सभांचे इतिवृत्त कायम केल्यानंतरची जबाबदारी महानगरपालिका प्रशासनाने घ्यावी.

**मा.श्री.अनंत जोशी :-** महानगरपालिकेच्या नविन प्रशासकीय इमारतीत आज पहिली सभा होत असतांना खुद्द आयुक्त साहेब आज मिटींगला उपस्थित नाहीत.

**मा.श्री.संदिप कोतकर महापौर :-** आयुक्त साहेब महानगरपालिका कामकाजा निमित्तच नाशिक येथे गेलेले आहेत.

**मा.श्री.अभय आगरकर :-** या विषयामध्ये नगरसचिवाला टार्गेट करु नका. त्यांची पात्रता पहा. त्यांना या पदावर काम करण्याची इच्छा नाही. ते वारंवार सांगतात नगरसचिव पदाचे काम मला नको दुस-या कोणालाही द्या. त्यांची तयारी नाही. योग्य पात्रतेची व्यक्ती त्या जागी नेमा अशी माझी या सभागृहास विनंती आहे.

उपायुक्त श्री.हांगे :- आगरकर सा़े, यांनी मांडलेला मुद्दा योग्य आहे. आपण योग्य पात्रतेच्या माणसाची नगरसचिव पदी नियुक्ती करण्यास जाहीरात दिली आहे. इतर नगरपालिका महानगरपालिका यांना पण पत्र दिलेली आहे. महानगरपालिका सभा प्रशासन कामकाजाचा १० वर्षाचा अनुभव व विधी शाखेची पदवी धारण करणारा असावा अशीपण अट नमूद केलेली आहे.

**मा.श्री.आगरकर :-** शासनास विनंती करुन त्यांचेकडुन कक्ष अधिकारी व तत्सम पदाचा अधिकारी मागवावा.

**मा.श्री.सुनिल त्रिपाठी :-** महानगरपालिकेच्या नविन प्रशासकीय इमारतीत आजची ही सभा बोलाविण्यात आली त्याबद्दल मी महापौर उपमहापौर यांचे प्रथम अभिनंदन करतो. आजचे हे जे मागील सभेचे इतिवृत्त कायम करण्यासाठी आलेले आहे. ते सभा झाल्यानंतर ५ महिन्यांनी आलेले आहे. ते ५-५ महिन्यांनी का येते ?

उपायुक्त श्री.हांगे :- महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक २००८ ची आचार संहिता लागू होती. त्यामध्ये बराच काळ गेला. त्या कालावधीत बैठक घेण्यात आली नाही. त्यामुळे मागील इतिवृत्त कायम करण्यास उशिर झालेला आहे.

**मा.श्री.सुनिल त्रिपाठी :-** स.नं.११७ व ११८ ची वरील आरक्षणाची माहिती पूर्णपणे चुकीची आहे. सदर जागा रयत शिक्षण संस्थेची आहे. मागील सभेत या जागेच्या आरक्षणा बाबत चर्चा झाली. चर्चा झाली एक आणि प्रोसिडींग मध्ये वेगळया पध्दतीने लिहीली गेलेली आहे. स्वातंत्र्य सैनिकांच्या जागेवरील आरक्षणा बाबत पण चूकीचा निर्णय घेण्यात आलेला आहे. हे इतिवृत्त मंजूर / कायम करण्यात येवु नये. संपुर्ण प्रोसिडींग चूकीचे झालेले आहे.

श्री.धोंगडे, नगररचनाकार :- सदर आरक्षणाच्या विषया बाबत आपली चर्चा झालेली होती. चर्चेप्रमाणे निर्णय घेण्यात आलेला आहे. आरक्षणांबाबत या सदस्यांनी याद्या पण दिल्या होत्या.

**मा.श्री.त्रिपाठी :-** सदस्यांच्या याद्यांचा प्रश्न नाही. चर्चा झाली एक आणि प्रोसिडींग लिहीले एक सदरचे प्रोसिडींग मंजूरीसाठी शासनाकडे पाठवू नका अन्यथा आम्हाला इतर पर्यायी मार्गांचा अवलंब करावा लागेल.

**मा.श्री.भगवान फुलसौंदर :-** शहरातील आरक्षणा बाबत झालेल्या चर्चे प्रमाणे इतिवृत्त लिहीले गेले नाही. आरक्षण कायम ठेवावे अशा ठिकाणी आरक्षण उठवावे असे केलेले आहे. सदर आरक्षणाचा विषयात पैसे खावुन काम झालेले आहे. यात मोठा अपहार झालेला आहे. सदरचा विषय पेडींग ठेवा नाहीतर सदर विषयावर मतदान घ्या. सदर विषयास भाजपा शिवसेना पक्षाच्या नगरसेवकांचा विरोध आहे.

**मा.श्री.कृ.द.जाधव :-** मागील सभेत हा विषय घेतला होता. आपण सर्वांनी त्यावर चर्चा केलेली आहे. सर्वांनी एकमताने विषयपण मंजूर केलेला आहे. सदर बाबत शासनाकडे शिफारशी पाठवा. चर्चेतुन समज गैरसमज करु नका.

**मा.श्री.कैलास गिरवले :-** मागील इतिवृत्त कायम करण्या करीता विषय ठेवलेला आहे. सभागृहात याबाबत चर्चाही झालेली आहे. इतिवृत्त कायम करताना तो विषय रद्द करता येत नाही. इतिवृत्तात काही सुचना / दुरुस्त्या करावयाच्या असतील तर त्या सुचना करा. मागील सभेत या विषया बाबत कोणीही विरोध केला नाही. आरक्षणाच्या यादीत शेतकरी व गरीब कुटुंबातील व्यक्तींचेही आरक्षण उठवले आहे. त्यांची संख्या जवळ जवळ ८० ते ९० % आहे. माझी सभागृहास विनंती आहे की, मागील इतिवृत्त कायम करण्याचा विषय मंजूर करावा.

**३) प्रभाग समित्या स्थापन करणे :-**

**मा.श्री.अभय आगरकर :-** भौगोलिक क्षेत्रानुसार प्रभाग समितीची कामाची कक्षा ठरविण्यात आलेली आहे. त्याची भौगोलिक रचना स्पष्ट करा ?

ज्यु.इंजिनिअर श्री.बल्लाळ :- सार्वत्रिक निवडणुक २००८ मधील शहरातील प्रभागांची एकुण संख्या ६५ आहे. त्यानुसार प्रत्येक प्रभाग समितीत साधारणतः १४ ते १८ वॉर्ड घेण्यात आलेले आहेत.

**मा.श्री.अभय आगरकर :-** १४ ते १५ वॉर्डांचा एक प्रभाग केला पण त्या प्रभाग समितीतील सदस्यांची संख्या किती असेल.

**मा.श्री.संदिप कोतकर महापौर :-** त्या-त्या प्रभाग समिती कक्षेतील वॉर्डातून निवडुन आलेले पालिका सदस्य व त्या प्रभाग समितीच्या कार्यक्षेत्रात काम करणा-या मान्यता प्राप्त स्वयंसेवी संघटनेचे तीन नामधारी सदस्य नामनिर्देशित सदस्य असतील.

**मा.श्री.अभय आगरकर :-** हा प्रभाग समिती स्थापनेचा ठराव शासनाकडे मंजूरीसाठी जाणार व शासन त्याप्रमाणे मंजूरी देणार पण मुंबई महानगरपालिका, पुणे महानगरपालिका यांच्या पेक्षा आपल्या प्रभाग समित्या वेगळया आहेत असे का ?

उपायुक्त श्री.हांगे :- प्रभाग समित्या स्थापन करणेचा प्रस्ताव आल्यानंतर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम २९-अ नुसार प्रभाग समित्यांची संख्या ठरविण्यांत आलेली आहे. अहमदनगर महानगरपालिकेचे क्षेत्र विचारात घेता कोण-कोणत्या ठिकाणी प्रभाग समित्या ठेवावयाच्या त्या किती ठेवावयाच्या हे महानगरपालिका सभेने ठरवावयाचे आहे.

**मा.श्री.अभय आगरकर :-** प्रभाग समितीमध्ये स्वयंसेवी संघटनांना प्रतिनिधीत्व कसे देणार. स्वयंसेवी संघटनांचा ऑडीट रिपोर्ट हा चांगला असला पाहिजे. त्यांचे काम चांगले असावे. पारितोषिक पात्र स्वयंसेवी संस्थांना प्राधान्य द्यावे. चांगले काम करणा-या संस्था, ज्येष्ठ नागरीक संघटना असतील चांगले काम करणारे इंजिनिअर्स, आर्किटेक्ट असतील काही नामांकीत डॉक्टर्स वकील असतील त्यांचे काम पाहुन त्यांना प्राधान्यक्रम देवुन निवड करावी. स्नेहालय सारखी काम करणारी एखादी संस्था असेल अशा संघटना हव्या. त्यांना नियम निकष हवेत. अशी तरतुद करावी. शासनाकडे आमच्या शिफारशी कळवाव्यात.

उपायुक्त श्री.हांगे :- स्वयंसेवी संस्था होण्याचा निवडीचा अधिकार महानगरपालिकेकडे ठेवावा. अशी आपण तरतुद करु शकता.

**मा.श्री.अभय आगरकर :-** स्वयंसेवी संस्था फक्त नोंदणीकृत असाव्यात फक्त एवढेच पूरे नाही.

**मा.श्री.दिपक सुळ उपमहापौर :-** प्रभाग समित्या स्थापनेबाबतचा प्रस्ताव इतिवृत्त व आपण सर्वांनी केलेल्या सूचना या शासनाकडे मंजूरीसाठी पाठविल्या जातील. त्यात शासन त्यांच्या नियमाप्रमाणे दुरुस्त्या करुन पाठविल.

उपायुक्त श्री.हांगे :- प्रभाग समित्या स्ाािपन केल्यानंतर प्रत्येक प्रभाग समितीस तिच्या कार्यक्षेत्रातील कामकाजासाठी किती निधी मंजूर करावयाचा हा महानगरपालिका सभेचा अधिकार आहे. प्रभाग समितीचा निधी कमी जास्त प्रमाणात करु शकता. मात्र त्यासाठी अर्थ संकल्पातच तरतुद करावी लागेल.

**मा.श्री.दिपक सुळ उपमहापौर :-** प्रभाग समित्या स्थापन करतांना एक नविन नियम किंवा अट टाका की तो सदस्य माजी नगरसेवक असावा.

उपायुक्त श्री.हांगे :- मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९-अ व भारतीय राज्य घटनेच्या ७४ वी घटना दुरुस्ती परिच्छेद २४३ एस. नुसार व शासनाच्या मार्गदर्शनानुसार प्रभाग समित्यांची रचना करण्यात आलेल्या आहेत. त्या व्यतिरिक्त आपल्या काही सूचना असतील त्या आपण शासनास कळवू.

**मा.श्री.कैलास गिरवले :-** प्रभाग समितीत संघटनेचे प्रतिनिधी स्वतंत्र पण तीनही एकाच संघटनेचे की वेगवेगळया संघटनेचे एखारी व्यक्ती समाजसेवा करणारा एकटा असेल तर त्याचे काय ? त्याने महानगरपालिका कामकाजा संबंधी एखादा वैशिष्ट्यपुर्ण प्रकल्प केलेला असावा. महानगरपालिके बरोबर इतरही ठिकाणी त्याने कामे केलेली अट असावी.

उपायुक्त श्री.हांगे :- इतर ठिकाणी म्हणजे ग्रामीण भागात काम करणारी किंवा काम केलेली संस्था नको. कारण ग्रामीण समस्या व शहरी समस्या या वेगवेगळया असतात. त्यांना शहरी समस्यांवर काम करणे शक्य होणार नाही.

**मा.श्री.कैलास गिरवले :-** प्रभाग समितीचा सदस्य हा माजी नगरसेवक असल्यास चालणार नाही काय ?

उपायुक्त श्री.हांगे :- शासनाच्या मार्गदर्शनानुसार प्रभाग समितीचा आराखडा तयार करण्यांत आलेला आहे. आपल्या काही हरकती अगर सूचना असल्यास त्या द्या. आपण त्या शासनाकडे पाठवू.

**मा.श्री.अनंत जोशी :-** प्रभाग समितीचा सदस्य हा त्या भागातीलच रहिवासी असावा.

**मा.श्री.कृ.द.जाधव :-** प्रभाग समितीचा सदस्य हा नगरसेवक असावा पण तो पराभूत झालेला नसावा.

**मा.श्री.बहिरनाथ वाकळे :-**

**मा.श्री.संदिप कोतकर महापौर :-** आपल्या सर्व सूचना / मुद्दे घेवून ते शासनाकडे पाठविले जातील तसेच प्रभाग समिती क्रमांक प्रभाग समिती क्रमांक हा प्रभाग.

विषय क्रमांक ४) **मा.श्री.दिप चव्हाण :-** ऑफिस रिपोर्टानुसार विषय मंजूर.

विषय क्रमांक ५) **मा.श्री.दिप चव्हाण :-** ऑफिस रिपोर्टानुसार विषय मंजूर.

विषय क्रमांक ६) **मा.श्री.कैलास गिरवले :-** छत्रपती संभाजी महाराजांचा पूर्णाकृती पुतळा बसविण्यास महासभेने मंजूरी दिलेली आहे. कलासंचालनालय व मुख्य वास्तुशास्त्रज्ञ यांनी पण मंजूरी दिलेली आहे. आणि आता अखेर मंजूरीस मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडे प्रस्ताव पाठविलेला आहे. संभाजी महाराजांचा पूतळा तयार झालेला आहे. सदर पूतळा बसविणे कामी चार सदस्यांची समिती स्थापन करण्यात यावी म्हणजे पूतळा उभारणीचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्यांत येईल.

**मा.श्री.अभय आगरकर :-** छत्रपती संभाजी महाराज यांचा पूर्णाकृती पूतळा बसविणे कामकाजासाठी ४ सदस्या ऐवजी ५ सदस्यीय कमिटी नेमली तरी चालेल. पण नेमलेले सदस्य या कामाशी एकनिष्ठ असतील हे पहावे. सदर कमिटीमध्ये आज नेमलेले जे सदस्य असतील तेच शेवटपर्यंत कायम रहातील. आजची बॉडी जरी अस्तीत्वात नाही राहीली तरी आज नियुक्त केलेलेच सदस्य शेवटपर्यंत त्या समितीचे कामकाज पहातील.

यानंतर महानगरपालिका सभा कामकाज संपले.

-- * --

प्रस्ताव क्रमांक : १ :- नोंद घेण्यांत येत आहे.
सूचक : मा.श्री.
अनुमोदक : मा.श्री.
ठराव सर्वानुमते मंजूर

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

प्रस्ताव क्रमांक : २ :- मागील सभेचे इतिवृत्त कायम करणेस मंजूरी देण्यात येत आहे.

सूचक : मा.श्री.
अनुमोदक : मा.श्री.
ठराव सर्वानुमते मंजूर

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

प्रस्ताव क्रमांक : ३ :- ऑफिस रिपोर्ट व नकाशा या बाबत ठरविण्यांत येते की, नकाशा मध्ये दर्शविलेले प्रभाग समिती क्रमांक ----------- मधील प्रभाग क्रमांक --------- मध्ये समाविष्ठ करावा व प्रभाग समिती क्रमांक ------------- मध्ये प्रभाग क्रमांक -------- या दर्शविणेत यावा. अशा प्रकारचे दुरुस्तीसह सभागृहाचा कल या सन्माननीय सदस्य यांनी केलेल्या पुढील सूचना देखील प्रभाग समिती तयार करतांना प्राधान्याने विचारात घेण्यांत याव्यात.

१) स्वयंसेवी संस्था मधील सदस्य यांचा समावेश प्रभाग समिती सहाय्यक पदावर निवड करताना, सदर संस्थेची निवड प्रशासनाने दक्षता पूर्वक करावी.

२) अशा संस्थेचा सदस्य निवडणे पूर्वी संबंधित संस्थेचा तीन वर्षाचा जमा-खर्च यांचा ताळेबंदाची प्रत व लेखापरिक्षण अहवाल प्रत प्रशासनाने तपासावी.

३) समाजामध्ये अग्रगण्य असलेल्या संस्थेमध्ये पदावर कार्यरत सदस्य तसेच विविध क्षेत्रात नैपूण्य मिळविलेली व्यक्ती यांस प्राधान्य असावे.

४) प्रभाग समिती मधील प्रभागाकरीता नागरी सुविधा देण्याकरीता निधीची आवश्यकता असणार आहे अशा निधीची प्रभाग निहाय निश्चीत स्वरुपाची रक्कम महासभेने ठरवावी. तसेच ठरलेल्या रकमेचे अर्थ संकल्पामध्ये तरतुद करावी.

५) माजी नगरसेवक असलेल्या व्यक्तीस प्रभाग समितीचा सदस्य निवडणेस देखिल प्राधान्य असावे मात्र अशी व्यक्ती महानगरपालिकेच्या निवडणुकीत भाग घेवुन पराभुत झालेली नसावी.

६) प्रभाग समिती मा.सदस्य हा संबंधित प्रभागामध्ये रहिवाशी असावा किंवा परिसरातील रहिवाशी असावा मतदार यादीमध्ये सदरचे व्यक्तीचे नांव असणे आवश्यक.

७) कायद्याचे ज्ञान असणा-या अनुभवी तसेच पदवीधर व्यक्तीस प्राधान्य देण्यांत यावे.

८) प्रभाग समितीचा सदस्य होण्याकरीता महानगरपालिकेचे कराची त्याचे स्वत:चे नावावर थकबाकी असु नये.

९) इतर महानगरपालिकेमध्ये प्रभाग समिती सदस्य निवडतांना कोणते निकष वापरले प्रभाग निहाय लोकसंख्या तसेच त्यांनी केलेली आर्थिक तरतुद याबाबत माहिती संकलीत करावी.

१०) स्वयंसेवी संस्थेचा सदस्य निवडतांना सदर संस्था महानगरपालिका हद्दीमध्ये कार्यरत असावी.

सुचक : मा.श्री.कृ.द.जाधव,
अनुमोदक : मा.श्री.अभय आगरकर,
ठराव सर्वानुमते मंजूर

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

प्रस्ताव : ४ :- ऑफिस रिपोर्ट मंजुर नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री.दिप चव्हाण,
अनुमोदक : मा.श्री.कृ.द.जाधव,
ठराव सर्वानुमते मंजूर.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

प्रस्ताव : ५ :- ऑफिस रिपोर्ट मंजूर. नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री.नामदेव पवार,
अनुमोदक : मा.श्री.भगवान फुलसौंदर,
ठराव सर्वानुमते मंजूर.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

प्रस्ताव : ६ :- ऑफिस रिपोर्ट मंजूर. छत्रपती संभाजी महाराज पुतळा देखभाल समिती पदी सदस्य नियुक्तीचे अधिकार मा.महापौर यांना देण्यात येत आहे. या समितीचे अध्यक्ष मा.महापौर असतील.

तसेच मा.उपायुक्त (सा), मा.उपायुक्त (कर) तसेच नगररचनाकार व शहर अभियंता हे प्रशासनिक सदस्य या समितीत समावेशीत करणेस तसेच या कामातील माहिती असलेली व्यक्ती नियमित सदस्य या पदी नियुक्ती करणेस ही सभा मान्यता देत आहे. या समितीची बैठक घेणे व त्यांचे कामकाज शहर अभियंता यांचे कार्यालया मार्फत करणेत यावे.

सुचक : मा.श्री.कैलास गिरवले,
अनुमोदक : मा.श्री.अभय आगरकर,
ठराव सर्वानुमते मंजूर.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९-अ प्रभाग समित्यांची स्थापना तसेच भारतीय संविधानाच्या ७४ व्या घटना दुरुस्तीतील परिच्छेद २४३ नुसार.**

---*---

**वॉर्डांची संख्या :- ६५**

**लोकसंख्या :- ३,०६,३८१**

**शहराचे क्षेत्रफळ :- ८४ चौ.कि.मी.**

**भौगोलिक संलग्नता असलेले प्रभाग.**

| **प्रभाग समिती क्रमांक व कार्यालयाचे स्थळ व समाविष्ट प्रभाग संख्या** | **समाविष्ट प्रभाग** | **प्रभाग समितीमध्ये समाविष्ट भाग** |
|---|---|---|
| प्रभाग समिती क्र.१ सावेडी उपनगर क्षेत्र समाविष्ट प्रभाग संख्या - १७ | १,२,३,४,५,७,८, ९,१०,११,१२,१३, १४,१५,१६,१७,१८ | बोल्हेगांव, नागापूर, नगर-मनमाड रोड, आठरे पाटील शाळा, भिस्तबाग, तपोवन रोड, ढवणवस्ती, पाईपलाईन रोड, गुलमोहोर रोड, भिस्तबाग रोड, लक्ष्मीनगर, सुर्यानगर, संचारनगर, यशोदानगर, श्रीरामचौक, वसंत टेकडी, कविजंग नगर, तवलेनगर, मार्कंडेय सोसायटी, आनंदनगर, टी.व्ही.सेंटर, पाईपलाईन हडको, सिव्हील हडको, ( ), सावेडी गावठाण, प्रोफेसर कॉलनी चौक, झ ोपडी कॅन्टीन परिसर, धर्माधिकारी मळा, रासनेनगर, वैदुवाडी, कोहीनूर मंगल कार्यालय, जुना पिंपळगांव रोड. |
| प्रभाग समिती क्र.२ जूने महानगरपालिका कार्यालय नगर गांवठाण समाविष्ट प्रभाग संख्या - १८ | ३४,३५,३६,३७, ३८,३९,४०,४१, ४२,४३,४६,४७, ४९,५०,२६,२७, २८,१९ | बागडपट्टी, सर्जेपूरा, जुने सिव्हील हॉस्पीटल, चितळेरोड, तोफखाना, दिल्लीगेट परिसर, सातभाई मळा, नालेगांव, अमरधाम, सबजेल चौक, आनंदीबाजार, गौरीघुमट, लक्ष्मीकारंजा, नविपेठ, महात्मा गांधी रोड, माळीवाडा, फिरोदिया हायस्कुल, विशाल गणेश मंदीर, वसंत टॉकीज परिसर, आशा टॉकीज चौक, कोतवाली पोलिस स्टेशन, महावीर चौक, पटवर्धन चौक, कोर्ट परिसर, झारेकर गल्ली, गाडगीळ पटांगण, महावीर नगर, भुतकरवाडी, बालिकाश्रम रोड, बागरोजा हडको, दातरंगे महा, बालिकाश्रम झोपडपट्टी मार्केट यार्ड, माळीवाडा हरीजन वस्ती, कोठी, कानडेमळा व मद्रासी चाळ, संभाजी महाराज व्यापारी संकुल, नालेगांव, नगर-कल्याण रोड, आदर्शनगर, भावनाऋषी सिनानदीचा पश्चिमेकडील भाग. |

| | | |
|---|---|---|
| प्रभाग समिती क्र.३ रंगभवन समाविष्ठ<br>प्रभाग संख्या - १४ | ६,२०,२१,२२,२९,२३,२४,२५,३०,३१,३२,४४,४५,३३. | जुने मुकुंदनगर, नविन मुकुंदनगर, वाबळे कॉलनी, फकीरवाडा,दर्गादायरा, डीएसपी ऑफिस, तारकपूर, सेंट झेव्हीयर हायस्कुल, कराचीवाला नगर, रामवाडी, मंगलगेट, बेलदारगल्ली, झेंडीगेट, तालुका पोलिस स्टेशन, हमालवाडा, अशोका हॉटेल, टेलिफोन व पोस्ट ऑफिस, बुथ हॉस्पीटल, जिल्हाधिकारी व उपजिल्हाधिकारी कार्यालय व निवासस्थाने, अहमदनगर कॉलेज, यशवंत कॉलनी, सिध्दार्थ नगर, रंगभवन कोठला झोपडपट्टी बारस्कर कॉलनी, लालटाकी, सिव्हील हॉस्पीटल, तारकपूर बस स्टॉप, विराज कॉलनी, आरटीओ मधील शासकीय कर्मचारी निवासस्थाने, जुना दाणेडबरा, पारशाखुंट, रामचंद्र खुंट, आडतेबाजार, पिंजारगल्ली, हातकपूरा, ऐतिहासिक वस्तु संग्रहालय, सी.एस.आर.डी., बाबा बंगाली. |
| प्रभाग समिती क्र.४<br>बुरुडगांव उपकार्यालय<br>समाविष्ठ प्रभाग<br>संख्या - १६ | ४८,५१,५२,५३,५४,५५,५६,५७,५८,५९,६०,६१,६२,६३,६४,६५. | वाडियापार्क, नवा व जुना टिळक रोड, बुरुडगांव भाजी मार्केट,रमन कार्यालय,कोठी रोड पूर्व भाग, भाजी मार्केट, सारसनगर, केदारेवस्ती, शांतीनगर, विनायक नगर, आय.टी.आय., शासकीय तंत्रनिकेतन, आनंदनधाम, आनंदऋषी हॉस्पीटल, भोसले आखाडा,चंदन इस्टेट, बुरुडगांव रोड, बुरुडगांव गावठाण,आझादनगर, जुना नविन कचरा डेपो, व्ही.आर.डी.ई.पट्टीवर, नगर-दौंड रोड, दौंड रेल्वे लाईन, केडगांव औद्योगिक वसाहत, केडगांव देवी मंदीर, केडगांव गावठाण, केडगांव हरीजन वस्ती, रेल्वे स्टेशन, आगरकर मळाख कायनेटीक चौक, मल्हार चौक, लोखंडी पुल, भिमदरी, जयभीम सोसायटी, पंचशील कॉलनी, अचानक वस्ती, सक्कर चौक, विळे रोड, कारमेल शाळा, अयोध्यानगर, भुषणनगर, वैष्णवनगर, शाहूनगर, कांबळेमळा, पाच गोडावून, नगर-पुणे रोड, सोनेवाडी रस्ता. |